3 ऱ्या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास
सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज
ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !

पंकज गुंदेचा 9822496664
9403448649

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
दैनिक
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी , पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.
या सारख्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.
शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक
पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक २८१ वा ● सोमवार, ता. ७ एप्रिल २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

रयत समाचार पोर्टल
Scan QR Code

रयत समाचार चॅनल
Scan QR Code

इंग्रजी रयत समाचार वाचण्यासाठी
Scan QR Code

# गोवा बोर्डाने रचला विक्रम : केवळ १५ दिवसांत परीक्षा निकाल जाहीर

## अध्यक्ष भगीरथ शेट्ये यांच्या दूरदृष्टीचे फलित

**आज ७ एप्रिल सायंकाळी ५ वाजता होणार निकाल जाहीर**

**एसएससी रिझल्ट पहाण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा**

**पणजी । प्रभाकर ढगे**

गोवा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, एसएससी (SSC) मार्च २०२५ परीक्षा १ मार्च ते २१ मार्च २०२५ या कालावधीत झाली. या परीक्षेसाठी एकूण ३२ परीक्षा केंद्रांची व्यवस्था करण्यात आली. परीक्षेला नियमित प्रवर्गातून १८,८३८ विद्यार्थी बसले होते. त्यामध्ये ९,२८० मुले व ९,५५८ मुलींचा समावेश होता. या परीक्षेचा निकाल ७ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता गोवा बोर्डाच्या पर्वरी येथील कार्यालयात जाहीर होणार. निकालाच्या दिवशी www.gbshse.in तसेच https://results.gbshsegoa.net/#/ या अधिकृत संकेतस्थळांवर निकाल उपलब्ध होणार. त्याशिवाय डिजीलॉकर अॅप व संकेतस्थळावरही निकाल पाहता येणार आहे. मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, ९ एप्रिलपासून शाळांसाठी संयुक्त निकालपत्र संकेतस्थळावरून (https://service1.gbshse.in) उपलब्ध होईल. शाळांसाठी निकाल पुस्तिकासुद्धा अधिकृत संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येणार आहे. यंदा परीक्षा संपल्यानंतर अवघ्या १५ दिवसांत निकाल जाहीर करणे हे मोठे यश मानले जात आहे.

सामान्यतः अनेक राज्यांमध्ये निकाल जाहीर करण्यास महिन्याभरापेक्षा जास्त वेळ लागतो. मात्र गोवा बोर्डाने वेगवेगळ्या श्रेणीतील परीक्षार्थींची माहिती, परीक्षा केंद्रांची संख्या आणि अन्य प्रक्रिया वेळेत पार पाडत विक्रमी वेळेत निकाल जाहीर करण्याचा निर्णय घेतला आहे. ही प्रक्रिया इतक्या वेगात पार पाडणे हे निश्चितच कौतुकास्पद आहे. या ऐतिहासिक यशामागे गोवा बोर्डाचे अध्यक्ष भगीरथ शेट्ये यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, नियोजन आणि कार्यक्षमतेचा मोठा वाटा आहे. परीक्षा प्रक्रियेतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन. यावर्षी भगीरथ शेट्ये यांच्या मार्गदर्शनाखाली बोर्डाने मूल्यांकन केंद्रांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढवली. यामुळे परीक्षकांना जवळच्या केंद्रांवर सहजपणे पोहोचता आले आणि मूल्यांकन प्रक्रियेत वेग आला. अध्यक्ष शेट्ये यांनी नियोजनबद्ध पूर्वक परीक्षा संपण्याआधीच मूल्यांकन केंद्रांची आखणी केली होती, ज्यामुळे वेळेची बचत झाली. तसेच परिक्षक व शाळांकडून मिळालेला उत्तम प्रतिसाद हे देखील या यशाचे एक महत्त्वाचे कारण ठरले. अध्यक्ष भगीरथ शेट्ये यांनी प्रत्येक परिक्षक व शाळेशी थेट संपर्क ठेवून त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन आणि प्रोत्साहन दिले. शाळांनीही शेट्ये यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत आपल्या परिक्षकांना वेळेवर पाठवले.



या सर्व प्रक्रियेमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करण्यात आला. उत्तरपत्रिकांचे डिजिटल ट्रॅकिंग, त्वरित तपासणीचे सॉफ्टवेअर आणि ऑनलाइन फीडिंग यामुळे वेळ वाचवला गेला. अध्यक्ष शेट्ये यांनी या तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला आणि त्यासाठी आवश्यक त्या सुविधा बोर्डकडून उपलब्ध करून दिल्या. विद्यार्थ्यांसाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. यावर्षी एप्रिल मध्ये शैक्षणिक वर्ष सुरू होणार आहे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी वर्षभरापासून मुख्यमंत्री तथा शिक्षणमंत्री डॉ.प्रमोद सावंत तसेच शिक्षण सचिव प्रसाद लोलयेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक बैठका संपन्न झाल्या. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील परख संस्थेची कार्यशाळा देखील नुकतीच संपन्न होऊन राज्यातील शिक्षकांना या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले हे सर्व घटक विचारात घेऊन शैक्षणिक वर्ष वेळेवर सुरू होण्यासाठी तसेच देशातील इतर मंडळांशी सुसंगतता राखण्यासाठी दहावीचा निकाल लवकर लागणे आवश्यक होते. त्यामुळे या निकालाचे महत्व अनन्यसाधारण असे आहे.

अकरावीच्या विद्यार्थ्यांना लवकर निकाल जाहीर झाल्यामुळे पुढील अभ्यासक्रमासाठी वेळेवर अर्ज करता येणार आहे. अनेक पालक आणि शिक्षकांनीही भगीरथ शेट्ये यांच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. गोवा राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात हे एक सकारात्मक पाऊल मानले जात आहे. भगीरथ शेट्ये यांच्या नेतृत्वाने गोवा बोर्डाला नव्या उंचीवर नेले आहे. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच संपूर्ण गोवा राज्यात शिक्षण व्यवस्था अधिक गतिमान आणि पारदर्शक बनली आहे.

शेट्ये यांचे ध्येय केवळ निकाल वेळेवर जाहीर करणे नव्हते, तर विद्यार्थ्यांचा विश्वास आणि भविष्य सुरक्षित ठेवणे हेही होते. त्यांच्या मार्गदर्शनाने परीक्षा प्रक्रियेत जो बदल झाला आहे, तो पुढील अनेक वर्षांसाठी एक आदर्श ठरेल.

राष्ट्रीय स्तरावर परखने अलीकडेच गोवा बोर्ड अव्वल असल्याचे शिक्कामोर्तब केल्यानंतर शालांत परीक्षेचा निकाल अवघ्या पंधरा दिवसाच्या कालावधित जाहीर होणार असल्यामुळे आणखी एक मानाचा तुरा गोवा बोर्डच्या शिरपेचात खोवला जाणार आहे. भविष्यातही असेच कार्यक्षम निर्णय घेतले गेले, तर गोवा राज्य देशातील एक आदर्श शैक्षणिक राज्य म्हणून नावलौकिक मिळवेल यात शंका नाही. भगीरथ शेट्ये यांच्या नेतृत्वाखाली गोवा बोर्डाची वाटचाल अधिक गतिमान व गुणवत्तापूर्ण होईल, अशीच अपेक्षा सर्वत्र व्यक्त केली जात आहे.

ईश्वर टी अँण्ड नाष्टा सेंटर
संपुर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव
सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी

प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

# चिंचोक्यांना सर्वाधिक भाव

**श्रीरामपुर । शफीक बागवान**

**चिंचोक्यांना ३ हजार ५०० रुपये क्विंटल असा भाव मिळत आहे. गेल्या ४० वर्षांपासून आम्ही या व्यवसायात आहोत. मात्र चिंचोक्यांना असा भाव कधीच पाहिला नव्हता, असे व्यापारी जाकीर बागवान यांनी नमूद केले.**

'आम्ही पैसे मोजतो, चिंचोके नाही' अशी म्हण आता कालबाह्य करता येईल, असा चिंचोक्याचा दर झाला असून चिंच १० हजार रुपये क्विंटल तर चिंचोक्याचा दर ३ हजार ५०० रुपये क्विंटल असा झाला आहे. गेल्या पन्नास वर्षातील हा सर्वाधिक भाव असल्याचे मानले जात आहे. सोयाबीनला गेल्या कित्येक महिन्यांपासून हमीभावापेक्षा कमी भाव मिळतो आहे. सोयाबीनचा हमीभाव ४ हजार ८०० रुपये पण सोयाबीन देखील ३ हजार ८०० रुपये प्रति क्विंटलने विकली गेली आहे. सोयाबीनला ३ हजार ८०० आणि चिंचोक्यांना ३ हजर ५०० मोजण्याची वेळ आली आहे. यावर्षी बाजारपेठेत चिंचेची आवक कमी झाली आहे. दक्षिण भारतात चिंचेची मागणी मोठ्या प्रमाणावर आहे. चिंचोक्यावर प्रक्रिया करणारे उद्योगही मोठे असल्यामुळे चिंचोकांनाही मागणी असल्याचे आडत व्यापारी शकील चांदभाई बागवान म्हणाले चिंचोक्याचा वापर कापड व कागद उद्योगात केला जातो. चिंचोक्याचे वरचे काळे टरफल फोडून मधला पांढरा भाग टॉर्च म्हणून वापरला जातो. बार्शी हे चिंचोक्याचे राज्यातील मोठे व्यापारी केंद्र आहे, अशी माहिती बेलापूर येथील चिंच व्यापारी जाकीर अहमद बागवान यांनी दिली.

# भाजपा माजी खा.तडस यांना पुजाऱ्याने राममूर्तीच्या पूजेपासून रोखले

**वर्धा । समता विकास**

जिल्ह्यातील देवळी येथील राममंदिरात ही घटना घडली आहे. सतत देव देव करणारे भाजपचे माजी खासदार रामदास तडस यांना राममूर्तीच्या पूजेपासून पुजाऱ्याने रोखले.

देवळीतील राम मंदिरात हा अत्यंत अपमानास्पद अनुभव रामदास तडस व त्यांच्या पत्नी शोभा तडस यांना रामनवमीच्या दिवशी आला. यावेळी अनेक भाजपचे पदाधिकारीही त्यांच्यासोबत होते. मात्र त्यांच्यासह तडस यांना पुजाऱ्याला सुनावण्याचे धाडस काही झाले नाही. पुजाऱ्याने तडस यांना आणि त्यांच्या पत्नीला गाभाऱ्यात प्रवेश करण्यापासून रोखल्यावर त्यांनी गाभारा सोडला आणि कठड्याच्या बाहेर येऊन दर्शन घेतले. पूजेचे ताट त्यांच्या हातातच राहिले. राममूर्तीवर त्यांना फुलेही वाहता आली नाहीत. या घटनेनंतर



बोलताना तडस म्हणाले, मला निश्चितच वाईट वाटले. या मंदिरात विविध सुधारणा करण्यास मी व गावकऱ्यांनी वेळोवेळी मदत केली. हे पुजारी महोदय कुटुंब पिढीजात आहे. सध्या ते पुणे येथे स्थायिक असून केवळ रामनवमीला देवळी येथे येतात. त्यांनी सोवळंओवळे काय लावले आहे. एक दिवसासाठी पुजारी येतात आणि नियम सांगतात, हे योग्य नाही. पण पुजारी आडूनच बसला होता, म्हणून मी वाद टाळला.

विशेष म्हणजे या गावातील मंदिरात महात्मा गांधी ज्यांना देवाची माणसं म्हणजे हरिजन म्हणत त्यांच्यासाठी मंदिर खुले व्हावे म्हणून महात्मा गांधी यांनी पुढाकार घेत मंदिर सर्वांसाठी खुले केले होते. तिथेच असे घटना झाल्यानंतर आता गावकरी संताप व्यक्त करत आहेत.

# मंडळाधिकारी डॉ.शेख यांना राज्याचा प्रथम पुरस्कार प्रदान

**कर्जत । रिजवान शेख**



तालुक्यातील मिरजगाव येथील रहिवाशी व राहता येथे कार्यरत मंडळाधिकारी डॉ.मोहसीन शेख यांना महाराष्ट्र राज्याचा राजीव गांधी प्रशासकीय गतिमान अभियान व स्पर्धा यातील शासकीय कर्मचारी विभागात महाराष्ट्र राज्याचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ.मोहसीन शेख हे दुसऱ्यांदा पुरस्काराचे मानकरी ठरले. शेख यांनी केलेल्या राज्यातील पहिल्या क्यूआर कोड वाचनालय संकल्पनेसाठी हा पुरस्कार जाहीर करण्यात आला. या आधी देखील राहता मंडळात महसूल अर्धन्यायिक निकाल पत्रक क्यूआर कोडचा माध्यमातून देण्याचा नाविन्यपूर्ण होता. या उपक्रमाला देखील हा बहुमान मिळाला होता. या पुरस्काराचे मानकरी शेख हे राज्यातील पहिलेच मंडळाधिकारी ठरले आहेत. यापूर्वी महाराष्ट्र शासनाचे अहमदनगर जिल्ह्याचे आदर्श तलाठी पुरस्कार देण्यात आला. राज्यस्तरीय युवा आयडॉल पुरस्कार, उपविभागीय आदर्श कर्मचारी पुरस्कार, राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार आणि यशदा सर्वोत्तम मास्टर ट्रेनर नाशिक विभाग अशा अनेक शासकीय पुरस्काराने डॉ.शेख यांना सन्मानित करण्यात आले.

# महायुतीच्या जाहीरनाम्याची होळी करणार- घनवट

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**



कर्जमाफीच्या आश्वासनाच्या जीवावर सत्तेवर आलेल्या महायुती सरकारला २०२४ च्या विधानसभा निवडणुकीतील जाहीरनाम्याचा विसर पडला असुन महायुती सरकारमध्ये असलेल्या उपमुख्यमंत्री व सरकारचे अर्थमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांना कर्जबाकी भरण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे १४ एप्रिल रोजी सरकारच्या जाहीरनाम्याची होळी करत राज्यव्यापी आंदोलन करण्यात येणार असल्याचे स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट सांगितले याबाबतचे निवेदन त्यांनी प्रसिद्धीस दिले आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांचे कर्ज माफ, मोफत वीज तसेच सोयाबीनला २०% बोनस देऊन ६००० रुपये प्रति क्विंटल दर देण्याचे छापलेले आहे. तसेच या बाबत युतीचे प्रमुख नेते अजित पवार व देवेंद्र फडणवीस व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर सभांमध्ये घोषणाही केल्या होत्या. मात्र यापैकी कोणतेही आश्वासन पूर्ण केलेले नाही. याउलट शेतकऱ्यांना ३१ मार्च अखेर पीक कर्जफड न केल्यास वसुलीच्या नोटीसा पाठवण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची घोर फसवणूक होत आहे. सरकार ही आश्वासने पूर्ण करण्या ऐवजी शेतकऱ्यांना धमकावत आहे. त्यामुळे प्रत्येक गावात महायुती सरकारचा जाहीरनामा व बँकांनी दिलेल्या वसुलीच्या नोटीसांची होळी करण्याचे आंदोलन १४ एप्रिल २०२५ रोज करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# सेवा, संघटन आणि समर्पण त्रिसूत्रीवर विश्वास ठेवणाऱ्यांना शुभेच्छा- सभापती शिंदे

## भाजपा स्थापना दिनानिमित्त झेंडावंदन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या ४५ व्या स्थापना दिनानिमित्त अहमदनगर येथील पक्ष कार्यालयात झेंडावंदनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी सभापती राम शिंदे, शहराध्यक्ष अॅड. अभय आगरकर, भानुदास बेरड, सदा देवगांवकर, प्रशांत मुथा, मिलींद गंधे, सचिन पारखी आदी उपस्थित होते. यावेळी राम शिंदे म्हणाले, या दिवशी संघटन, सेवा, संघर्ष आणि सुशासनाच्या मूल्यांचा पुन्हा एकदा पुनर्प्रत्यय आला. हे केवळ झेंडावंदन नव्हते, तर आपल्या विचारधारेप्रती आणि राष्ट्रसेवेप्रती असलेली निष्ठा पुन्हा दृढ करण्याचा एक पवित्र क्षण होता. पक्षाच्या कार्यपद्धतीला आणि जनतेसाठी चाललेल्या प्रामाणिक प्रयत्नांना सलाम करत सेवा, संघटन आणि समर्पण या त्रिसूत्रीवर विश्वास ठेवणाऱ्या कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी मधुसूदन मुळे, सुनिल रामदासी, अनिल गट्टाणी, भैया गंधे, वसंत लोढा, साहेबराव विधाते, गिता गिल्डा, विवेकानंद इंग्लिश स्कूलचे दामोदर बठेजा, विवेक नाईक, बाबासाहेब वाकळे, बाळासाहेब महाडीक, अर्बन



बँकेचे सुवेंद्र गांधी, निशांत दातीर, महेश नामदे, छाया रजपूत, सुरेखा खरमाळे, संध्या पावसे, सविताताई कोटा, ज्योती दांडगे, पल्लवी जाधव आदी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संरक्षण विभागाने शहरातील बंद केलेले रस्ते होणार खुले?



**अहमदनगर । प्रतिनिधी**

शहरातील संरक्षण विभागाच्या हद्दीतून जाणारे रस्ते जे मागील अनेक वर्षापासून नागरिकांसाठी खुले होते ते संरक्षण विभागाकडून बंद करण्यात आले आहे. हे रस्ते पुन्हा खुले करण्याची मागणी माजी नगरसेवक शेख अहमद इसहाक यांनी खासदार निलेश लंके यांच्याकडे केली होती.

याच मागणीची दखल घेऊन खासदार निलेश लंके यांनी संसदीय अधिवेशनामध्ये संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेत हे रस्ते खुले करण्याची मागणी केली न्यायालयाच्या नव्या इमारतीपासून भुईकोट किल्ल्याकडे जाणारा रस्ता, नटराज हॉटेलपासून सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट स्कूल कडे जाणारा रस्ता तसेच दरेवाडी ग्रामपंचायत हद्दीतील रस्ता व इतर अनेक रस्ते संरक्षण विभागाकडून वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्यामुळे नागरिकांना शैक्षणिक, वैद्यकीय, कामासाठी अनेक अडचणींना सामना करावा लागत असल्याचे खासदार लंके यांनी मंत्री राजनाथ सिंह यांच्या निदर्शनास आणून दिले व संबंधित विभागाशी चर्चा करून या प्रश्नावर सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही मंत्री राजनाथ सिंह यांनी खासदार निलेश लंके यांना दिली.



# घरातच राम घडविण्याचा संकल्प करू या- हभप रिंगणे

## गोंदवलेकर महाराज मंदिरात रामनवमी साजरी

**अहमदनगर । विजय मते**

आजच्या जगात यशस्वी होण्यासाठी केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही तर शिस्त, आत्मनिर्भरता, नेतृत्व गुण, कष्ट करण्याची तयारी आणि नैतिकता या गोष्टी शिकणे गरजेचे आहे. रामाच्या चरित्रातून मिळणाऱ्या शिकवणींचे अनुकरण करा. रामाचे संपूर्ण जीवन नैतिकता आणि मर्यादांचे उत्तम उदाहरण आहे. रामाचे जीवन आदर्श मानून त्याचे गुण शिकण्यास प्रेरित केल्यास घरोघरी राम घडतील आणि राम घडावेत ही आजच्या काळाची गरज आहे. आजच्या रामनवमीला आपल्या घरात राम घडविण्याचा संकल्प करू या असे आवाहन हभप सुंदरदास रिंगणे यांनी प्रवचनातून केले.

सावेडी उपनगरात शिलाविहार येथील श्री. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज मंदिरात श्रीराम जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी भाविकांना रामनामाचे महत्व सांगून रामनवमी उत्सवाची परंपरा, चैतन्याचे धाम, प्रभू श्रीराम, रामवताराचे वैशिष्ट्य हभप रिंगणे देवांनी आपल्या प्रवचनांमधून सांगितले. गुढीपाडव्यापासून मंदिरात राम नामाचा जप सुरू करण्यात आला होता.दररोज नित्य नियमाने दुपारी ४ ते ६ या वेळेत भाविकांनी श्रीराम जय राम जय जय राम हा नामजप करीत रामनामाचे महत्त्व जाणून घेतले. रामनवमीला या जपाची सांगता श्रीरामांचा जन्म साजरा करून करण्यात आली.यावेळी हभप रेखाताई रिंगणे,भजनी मंडळ आदींनी राम जन्माचा पाळणा गात जन्मोत्सव साजरा करण्यात आला. श्रीरामांची महाआरती करण्यात आली. यानंतर महाप्रसादाने या जन्म सोहळ्याची सांगता झाली. सेवाभावी मंडळाचे सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# गृहप्रकल्पांसाठी एमइपी कन्सल्टंटची भूमिका महत्वाची- नानकर

## एमइपीएफ डिझाईन व बिल्डिंग सर्व्हिसेससाठी समन्वय विषयावर कार्यशाळा संपन्न




**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगरमध्ये मोठ्या गृह प्रकल्पांसाठी एमइपी कन्सल्टंट यांची भूमिका आगामी काळात महत्वाची ठरणार फ्लोनेट कंपनी मेकॅनिकल, प्लंबिंग, फायर फायटिंग, इलेक्ट्रिक डिझाईन, बिम समन्वयक या सर्व्हिसेस मध्ये प्रकल्पात समन्वयकाचे काम पाहत असल्याचे सांगून मेकॅनिकल मध्ये ए सी सिस्टिमचे प्रकल्पात योग्य डिझाईनसाठी आणि प्लॅन प्रमाणे ते जागेवर कार्यान्वित करण्याचे काम पाहते.

तसेच गरजेप्रमाणे ए सी सिस्टिम डिझाईन, हिट लोड डिझाइन, पार्कींग मधील लाईन डिझाईन या गोष्टी येतात. इलेक्ट्रिक सिस्टिम डीझाईन मध्ये इलेक्ट्रिक लोड कॅल्क्युलेशन, पॉवर सप्लाय, अर्थिंग, जनसेट बॅक अप, पॉवर डीस्ट्रिब्युशन डीझाईन याचा अभ्यास करावा लागतो. प्लंबिंग मध्ये वॉटर डिमांड कॅल्क्युलेशन, वॉटर व ड्रेनेज वॉटर डीस्ट्रिब्युशन, रेन वॉटर हार्वेस्टिंग, पाईपिंग आणि पंप डिझाईन, डिटेल स्पेसिफिकेशन व बिल क्वांटिटी काढाव्या लागतात. फायर फाईटिंग सिस्टीम डीझाईन मध्ये फायर स्प्रिंकलर सिस्टिम, फायर अलार्म, पंप रूम डीझाईन, डिटेल स्पेसिफिकेशन व बील क्वांटिटी काढणे या गोष्टींचा अंतर्भाव होतो. एम इ पी सर्व्हिसेस मध्ये आर्किटेक्चरल, स्ट्रक्चरल, इंटेरियर सिस्टीम तसेच बिल्डिंग आणि साईट सर्व्हीसेसचा अंतर्भाव असतो. मोठ्या प्रकल्पात एम इ पी सर्व्हिसेस घेतल्याने प्रोजेक्ट वेळेत आणि नियोजपूर्वक पूर्ण होणे, अनावश्यक चुका टाळणे , वापरकर्ता यांना योग्य उपभोग आणि सुरक्षितता बहाल होते. पर्यावरण पूरक बांधकाम झाल्याने एनर्जी बचत होते. असे फ्लो नेट इंजिनीअरिंग सर्व्हिसेसचे अनिकेत नानकर यांनी सांगितले आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हे अर्स असो आणि एसआरजे स्टील जालना यांच्या संयुक्त विद्यमाने एम इ पी एफ डिझाईन आणि बिल्डिंग सर्व्हिसेस साठी समन्वय या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी फ्लोनेट इंजिनीअरिंग सर्व्हिसेस कंपनीचे संचालक नितीन कुंभेकर,अनिकेत नानकर, विशाल सरोटे, एसआरजे स्टील कंपनीचे अविनाश पुरोहित आणि विशाल येसेकर तसेच एसा संस्था अध्यक्ष आदिनाथ दहिफळे, उपाध्यक्ष विनोद काकडे, खजिनदार भुषण पांडव, यश शहा, नंदकिशोर घोडके, विजय पादिर, सचिन डागा, संतोष खांडेकर, मयुरेश देशमुख, जितेश सचदेव, प्रितेश कांकरिया, प्रकाश जैन, सतीश कांबळे, सुरेश परदेशी, अशोक मवाळ, राजकुमार मुनोत, संजय पवार आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालक नितीन कुंभेकर म्हणाले की, विकासक यांच्या अनावश्यक खर्चात मोठ्या प्रमाणात बचत होते. एक चांगला एमइपी कन्सल्टंट व्यक्ती म्हणून काम करताना प्रोजेक्ट सुरुवातीस कन्सल्टंट यांची नियुक्ती करणे, कामास सुरुवात होणेआधी सर्व प्लॅन आणि ड्रॉइंग फायनल असणे, आर्किटेक्ट इंजिनीअर व कॉन्ट्रॅक्टर यांच्या बरोबर योग्य समन्वय तसेच वेळोवेळी कामाचा आढावा घेणे व साइट वर वेळोवेळी देखरेख या गोष्टी आवश्यक आहे.

एम इ पी अंतर्गत आपण बंगले, वाणिज्य, रहिवासी, हॉटेल, रिसॉर्ट, प्लॉटिंग, हॉस्पिटल, बिम यांचे काम योग्य रीतीने करू शकतो. त्याच प्रमाणे बिल्डिंग इन्फोरमेशन मॉडेलिंग बिम ही संगणक प्रणाली वापरल्यास कामामध्ये आणखी सुसूत्रता येत असल्याचे नमूद केले. कार्यक्रम आयोजनात आर्की. मानव निमसे यांचे सहकार्य लाभले. प्रदिप तांदळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर जितेश सचदेव यांनी उपस्थितांचे आभार मानले.



# सर्वसामान्य नागरिकांसाठी आरोग्यसेवा महत्त्वाची- सिद्दम

## प्रा. बत्तीन पोट्यान्ना प्राथमिक विद्यालयात नेत्र तपासणी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

सर्वसामान्य नागरिकांसाठी आरोग्य सेवा महत्त्वाची बनली असून, सर्वसामान्य वर्गाला महागाईच्या काळात आरोग्यसेवा घेणे परवडत नाही. महागाईच्या काळात सर्वसामान्यांची सोय होण्यासाठी आरोग्य शिबिर नागरिकांसाठी आधार ठरत आहे.

ज्येष्ठ नागरिकांमध्ये वाढलेले दृष्टीदोष कमी होण्यासाठी नेत्र तपासणी शिबिर महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे प्रतिपादन पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बाळकृष्ण सिद्दम यांनी केले. शहरातील गांधी मैदान येथे प्रा. बत्तीन पोट्यान्ना प्राथमिक विद्यालयात थोरात सुपर स्पेशालिटी आय केअर व अंजली चष्मावाला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत नेत्र तपासणी शिबिर घेण्यात आले. सीएसआरडीच्या इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क ॲण्ड रिसर्च अहमदनगर यांच्या सहकार्याने झालेल्या या शिबिरात सर्व शालेय शिक्षकांसह परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. सीएसआरडी येथील एमएसडब्ल्यूच्या मार्गदर्शिका वैशाली पठारे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या शिबिराचे उद्घाटन पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बाळकृष्ण सिद्दम यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीनिवास मुत्त्याल, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप छिंदम, प्राथमिकचे शिक्षक रावसाहेब इंगळे, अनंता गाली, शोभा बडगू, रत्ना रच्चा, सरोजिनी आतकरे, पुष्पा म्याकल आदी उपस्थित होते. या शिबिरात पालक व नागरिकांची मोफत नेत्र तपासणी करुन औषधोपचार करण्यात आले. तर गरजूंना शंभर रुपयात नंबरचे चष्मे उपलब्ध करुन देण्यात आले होते.

शिबिर राबविल्याबद्दल नागरिकांच्या वतीने आयोजकांचे आभार मानण्यात आले. शिबिर यशस्वी करण्यासाठी केदार दुर्गा, श्रवण घोगरे, प्रशांत गोयरे, शुभम वाघमारे, हर्षदा मांडेलकर यांनी परिश्रम घेतले.

# संपूर्ण भारतीय समाज इतर समाजांचा आदर करतो- डॉ. काटेवाला



**अहमदनगर । समीर मन्यार**

साडेचौदशे वर्षांपासून हिंदू-मुस्लिमांसह सर्व समाज बांधव एकत्र नांदत आहे , तरी अनोळखीपणा आहे. अज्ञान हे त्याचे एकमेव कारण आहे. सण उत्सव हे शक्तीप्रदर्शन बनले आहे. या सण उत्सवांचे महत्व व इतिहास आपल्याला सांगावा लागेल. संपूर्ण भारतीय समाज इतर समाजाचा आदर करतो, असे प्रतिदापन डॉ. इकराम काटेवाला यांनी केले. जमाअत-ए-इस्लामी हिन्दच्या वतीने रमजान ईदनिमित्त कासिमखानी मशिदीत शनिवारी ईद मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. एकमेकांविषयी आदर, स्नेहभाव, बंधुभाव, धार्मिक व सामाजिक एकोपा निर्माण व्हावा, हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. या कार्यक्रमावेळी विविध माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी अहमदनगर पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल लगड, ललित गुंदेचा, सूर्यकांत नेटके, पत्रकार बंडू पवार, गणेश देलमाडे, विठ्ठल शिंदे, दीपक कांबळे, मुरली तांबडे, भाऊ काळोखे, रामदास बेंद्रे, सूर्यकांत वरकड, सुभाष शिंदे,, सुनील चोभे, प्रशांत गवळी,बबलू शेख, समिर मन्यार, दौलत झावरे, रोहित वाळके, आदी उपस्थित होते. डॉ. इकराम काटेवाले म्हणाले, आपण सणामागचा उद्देश विसरलो, हा उद्देश सांगायला हवा. राष्ट्राचा इतिहास व संकल्पना इतरांपर्यंत पोहोचायला पाहिजे. रोजे, उपवास हे आत्मक्लेशासाठी नसतात, त्यात सूट दिलेली असते. उपवास हे सुधारणा करण्यासाठी तसेच स्वत:वर नियंत्रण व संयम ठेवण्यासाठी असतात. देशात शांतता व बंधूभाव वाढवण्याची गरज आहे. धार्मिक रचनांचा बारकाईने अभ्यास करावा, असे त्यांनी सांगितले. यावेळी मशिदीची माहिती व विविध प्रश्नांची उत्तरे मुस्ताक शेख यांनी दिली. प्रास्ताविक मोबिन खान यांनी केले. सूत्रसंचालन करून आभार मुस्ताक पठाण यांनी केले. यावेळी विविध वृत्तपत्रांचे प्रतिनिधी व इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल

आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**

परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.

- संपर्क -

८८८८३४७४११

निसार Art

सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट

7020356335 | 9860830016

पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



मे. रुपाली एजन्सी

फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स

राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.

(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०

ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!

कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द

जगदंबा टी सेंटर

चहा, कॉफी, लेमन टी

शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर

शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर

प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे

97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# प्रश्न सुटत नसेल तर जलसमाधी घेण्याची परवानगी द्या- संजय आंधळे

## ११ एप्रिल नंतर कुठल्याही क्षणी गावकरी घेणार पाझर तलावात सामूहिक जलसमाधी



**गोळेगाव येथील सरपंच, पदाधिकारी आणि शेतकरी यांनी शुक्रवार ता. ४ रोजी आमच्या कार्यालयास भेट देऊन गोळेगाव येथील भूजल मूल्यांकन अहवाल विषयी व पाणलोट कार्यवाही बाबत आपले म्हणणे मांडून सदर गाव सुरक्षित वर्गवारीमध्ये कसे येईल याबाबत चर्चा केली असून त्या अनुषंगाने कार्यालयामार्फत भूजल मूल्यांकन बाबत संबंधित विभागाकडून आवश्यक माहिती प्राप्त करून घेण्याकरिता संबंधित विभागास पत्र व्यवहार केलेला असून माहे जुलै सप्टेंबरपर्यंत भूजल मूल्यांकन बाबतचा अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करून पाणलोटची वर्गवारी बाबत अहवाल माहिती अवगत करण्यात येईल.**

**एस.एस.गावडे,**
वरिष्ठ भू वैज्ञानिक अधिकारी,
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, अहिल्यानगर

**गोळेगाव सह बोधेगाव, दिवटे, लाडजळगाव, शोभानगर, नागलवाडी शेकटे, आधोडी, हातगाव या गावचा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या यादीमध्ये समावेश करण्यासाठी संबंधित भूजल विभागाने शासनाच्या सर्व विभागाला लेखी पत्र देऊन अहवाल मागितला आहे, तसेच तालुक्यातील यापूर्वी समावेश झालेल्या गावाबद्दल भूजल विभागाने कुठलीही माहिती मागितली नाही मग याच गावासाठी वेगळा असा नियम का..? यापूर्वीचे वरिष्ठ भूवैज्ञानिक अधिकारी काटकर असताना आमच्या गावावर हा अन्याय झालेला असून संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कार्यवाही करावी.**

**संजय आंधळे,**
संस्थापक, अध्यक्ष झाड फाउंडेशन,
गोळेगाव

### मुख्यमंत्र्यासह सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले निवेदन

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

तालुक्यातील गोळेगाव येथील पाझर तलावाची दुरुस्ती करून पाण्याची साठवण क्षमता वाढवण्यासाठी सिमेंटची भिंत बांधावी तसेच भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्या यादीतील वर्गवारीत शासकीय विहिरीसाठी गोळेगावचा समावेश व्हावा या मागणीसाठी येथील गावकऱ्यांनी ११ मार्च रोजी शेवगाव-गेवराई महामार्गावरील बोधेगाव या ठिकाणी दोन तास रास्ता रोको आंदोलन केले होते. तसेच २८ फेब्रुवारी रोजी येथील पाझर तलावात उतरून चार तास जलआंदोलन देखील केले होते. परंतु अद्यापही कुठलाही तोडगा न निघाल्याने गेल्या दीड महिन्यापासून येथील ग्रामस्थांचे ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू असून मात्र प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणामुळे ग्रामस्थांनी वारंवार विविध आंदोलनाच्या माध्यमातून अधिकाऱ्यांना धारेवर धरले तरी सर्वच विभागाच्या अधिकाऱ्यांनी येथील शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्याने आता शेवटचा पर्याय म्हणून न्याय न मिळाल्यास संतापलेल्या गोळेगाव येथील ग्रामस्थांनी शुक्रवार ता. ४ रोजी मुख्यमंत्र्यासह सर्वच विभागाच्या अधिकाऱ्यांना लेखी निवेदन देत शुक्रवार ता. ११ एप्रिल नंतर कुठल्याही क्षणी आम्ही स्त्री, पुरुष आणि मुला-बाळासह पाझर तलावात जलसमाधी घेण्याचा इशारा देखील निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. तसेच याची सर्वस्वी जबाबदारी ही प्रशासनाची राहील असेही दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. यावेळी झाड फाउंडेशनचे संस्थापक, अध्यक्ष संजय आंधळे, शंकर फुंदे, संदीप फुंदे, अमोल वावरे, सोमनाथ आंधळे, नवनाथ फुंदे, जालिंदर बर्डे, सुरेश फुंदे, विकास आंधळे, दीपक आंधळे यांच्यासह आदी ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संबंधित निवेदनाच्या लेखी प्रति ह्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे, जलसंधान मंत्री संजय राठोड, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा जलसंधारण अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, वरिष्ठ भू वैज्ञानिक अहिल्यानगर, तहसीलदार शेवगाव, पोलीस निरीक्षक शेवगाव, गट विकास अधिकारी शेवगाव यांना माहितीस्तव देण्यात आले आहेत.

# वासुदेवांना वाढीव मानधनाची गरज



**वासुदेव ही लोककला जतन आणि संवर्धन करणे गरजेचे आहे.शासनाच्या प्रयोगात्मक लोककला सादरीकरण योजनेअंतर्गत लोककला क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्था,सेवाभावी संस्था,सांस्कृतिक कार्य संचालनालय यांनी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.शालेय विद्यार्थ्यांना वासुदेव या लोककलेचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.वासुदेव या लोककलेच्या माध्यमातून समाज प्रबोधन जागृती मोठ्या प्रमाणात केली जाऊ शकते.शासकीय योजनांची माहिती वासुदेव हे घरोघरी, गावोगावी,गाव खेड्यात नागरिकन पर्यंत पोहचऊ शकतात.तसेच शालेय विद्यार्थ्यांन मार्फत वासुदेव ही लोककला जतन व संवर्धन मोठ्या प्रमाणात करणे सहज शक्य आहे.महाराष्ट्र शासनाने वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रम व महोत्सवा प्रसंगी तसेच इतर कार्यक्रमांमध्ये या वासुदेव लोककलावंतांना सहभागी करून घ्यावे. लोक कलावंत वासुदेव ही लोककला सादर करणाऱ्या लोककलावंतांना अत्यंत तुटपुंजे मानधन मिळत आहे. वाढत्या महागाईच्या काळात दीड हजार रुपये महिना मानधनात उदरनिर्वाह करणे शक्य नाही. तसेच वासुदेव या लोक कलावंतांना प्रोत्साहित करण्यासाठी वाढीव मानधन शासनाने द्यावे अशी मागणी कला सम्राज्ञी पवळा कला मंचाचे अध्यक्ष श्रीकांत भालेराव यांनी महाराष्ट्र शासनाकडे मागणी केली आहे.**

वासुदेव म्हणजे अंगभरून पोशाख,हातात टाळ-चिपळ्या, डोक्यात विविधरंगी कवड्यांच्या माळांनी गुंफलेला मोरपिसाचा टोप,कपाळी गंध,गळ्यात विविध देवतांच्या माळा,कमरेला बासरी असं हवंहवंसं वाटणारं देखणं रूप,ऐटदार पेहरावातील वासुदेवाला पहाटेच्या प्रहरी गाणं म्हणत,दान मागत फिरताना पाहणं हा मन प्रसन्न करणारा अनुभव लोककलावंत वासुदेव संपत रामा गदाई यांच्या लोककलेतून संगमनेर शहरातील नागरिकांना येत आहे. संपत रामा गदाई, मु.पो. लोणी खुर्द, मापूरवाडी रोड, राहता, जिल्हा अहिल्यानगर,वय वर्षे ७० वडिलांचे नाव रामा गदाई तर आईचे नाव रंभाबाई रामा गदाई आहे.संपत रामा गदाई वयाच्या विसाव्या वर्षापासून वासुदेव ही लोककला सादर करत आहे. आपल्या वाढ वडिलांचा लोककलेचा पारंपारिक वारसा जपत आहे. नाशिक, आळंदी, पंढरपूर, त्रंबकेश्वर, पैठण, श्रीरामपूर, संगमनेर यासारख्या शहरात निम शहरात,ग्रामीण भागात घरोघरी जातात.भल्या पहाटे उठून तयारी करून सकाळी सहा वाजता बस ने प्रवास सुरू करतात.शहरात अथवा गावात गेल्यानंतर तेथील दुकाने, घरोघरी जाऊन गाणे म्हणतात. वासुदेव या लोककलेच्या माध्यमातून ते समाज प्रबोधन व जनजागृती करण्याचे कार्य करतात.वासुदेव ही लोककला काळाच्या ओघात लुप्त पावत चाललेली महाराष्ट्राच्या संस्कृतीचा एक अविभाज्य घटक आहे.परंतु त्यांचे मुले शिक्षण घेतल्यामुळे या लोककलेपासून दूर गेली आहे.त्यांचा नोकरी, व्यवसाय करण्याकडे कला आहे.अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये वासुदेव ही लोककला सादर करणारे लोक कलावंत संपत रामा गदाई यांच्याबरोबर दत्तू ओंकार गदाई,सुभाष सखाराम काळे हे रा. मु.पो.लोणी,तसेच छबु मोहन सुपेकर,अमोल रमेश सुपेकर राहणार कोपरगाव हे वासुदेव ही लोककला सादर करतात.म्हणजे हाताच्या बोटावर मोजणे इतके वासुदेव नगर जिल्ह्यात सध्या ही लोक कला जपत आहे.

**नितीनचंद्र भालेराव, संगमनेर**

# जिथे शांती नाही तिथे परमार्थ नाही- ह.भ.प. शिवलीलाताई



**शेवगाव । ऋषिकेश काळे**

वारकरी संप्रदायामध्ये प्रामुख्याने २२ अवतार मानले जातात त्यापैकी राम कृष्ण हरी हे आमच्यासाठी मूळ अवतार आहे याची सुरुवात जिथून आहे त्याचे नाव प्रभू रामचंद्र आहे देवाला नेहमी शांती लाभते जिथे शांती नाही तिथे परमार्थ नांदत नाही. आत्मा आणि परमार्थाचा मिलन म्हणजे काल आहे. आम्ही दैवाचे दैवाचे दास पंढरी रायाचे हीच आमची ओळख आहे असे प्रतिपादन आव्हाने बु येथे श्रीमद भागवत कथेच्या काल्याच्या किर्तनात समाज प्रबोधनकर हभप शिवलीला ताई पाटील यांनी केले. श्री गणपती मंदिर ट्रस्ट व आव्हाने पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थांच्या लोकवर्गणीतून आव्हाने बु येथे हभप ज्ञानेश्वरी, आर्वी, जिल्हा वर्धा यांचे श्रीमद भागवत कथा ३० मार्च ते ६ एप्रिल या कालावधीत संपन्न झाली. याच प्रसंगी कथेची सांगता हभप शिवलीला पाटील यांच्या कीर्तनाने झाली. नव्वद टक्के विज्ञान म्हणजे ज्ञानेश्वरी आहे ज्या बाईने अखंडीतपणे संस्कार मर्यादा संस्कृती सांभाळून संसार केला ती परिस्थितीमुळे कमी शिकली. स्वतः चे अस्तित्व अहंकार निर्माण करण्यासाठी आजकालची माणसे देवालाही कलंकित करायला सोडत नाही तिथे कर्म आहे तिथे जन्म मृत्यू आहे मनुष्य जन्माचा योग्य उपयोग केला नाही तर पश्चाताप करण्याची वेळ येते. असे प्रतिपादन शिवलीला पाटील यांनी केले.कीर्तनानंतर सर्व ग्रामस्थांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते महाप्रसादाची पंगत शिवाजी औटी आणि भगवान भुसे यांच्या तर्फे करण्यात आली होती. प्रभू रामचंद्राच्या जन्मोत्सव निमित्ताने हभप ज्ञानेश्वरी यांची श्रीमद भागवत कथा मोठ्या उत्साहात पार पडली. काल्याच्या कीर्तनप्रसंगी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्त व महिला मंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



# विठाई ॲक्सीडेंटल ॲण्ड मल्टीस्पेशलिटीचे उद्‌घाटन

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीराम नवमीच्या शुभ मुहूर्तावर रविवार ता. ६ एप्रिल २०२५ रोजी सर्वोत्तम सुविधा विश्वासार्ह सेवा देणाऱ्या नुतन विठाई ॲक्सीडेंटल ॲण्ड मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटलचे उद्घाटन पारनेर -नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. काशिनाथ दाते यांच्या अध्यक्षतेखाली कार्याध्यक्ष आदर्शगाव समिती महाराष्ट्र राज्य पद्मश्री डॉ. पोपट पवार यांच्या हस्ते व डॉ.सचिन नागापुरकर, डॉ.संजय चव्हाण, डॉ. हर्षल सावजी, डॉ. आकाश सोमवंशी, डॉ दिपक निळे, डॉ.नितिश अग्रवाल, डॉ.मिलिंद चाकणे, डॉ प्रसाद लाड, डॉ.संदिप पाटील, डॉ.पुनम चव्हाण, डॉ.सुरज भोस, डॉ.गिरिष वाठ, डॉ.तुषार रोहकले, डॉ.बापुसाहेब कांडेकर, डॉ.मनोज तोडकर, डॉ.माजीद मोहंमद यांच्या हस्ते व शशिकांत सुतार, बबनराव पाचपुते, घनश्याम आण्णा शेलार, बाळासाहेब नाहटा,दत्तात्रय पानसरे, अण्णासाहेब शेलार, अनिल ठवाळ, राजेंद्र म्हस्के,बंडु रोहकले, संभाजी रोहकले किसन आघाव,लिलावती रोहकले ,धीरज डांगे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

मान्यवरांनी शुभेच्छा देताना पांडुरंगाच्या आईच्या नावाने सुरु केलेल्या विठाई नावात सर्वांना सामावून घेण्याची संकल्पना असुन कमी दरात नागरिकांना सर्वोत्तम सुविधा देतील अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी बोलतांना विठाई ॲक्सीडेंटल व मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. प्रशांत बोऱ्हुडे व डॉ.दिप्ती बोऱ्हुडे म्हणाले आम्ही कंबर, पाठदुखी, मणक्याचे आजार (गॅप डिस्क) , मान, सांधेदुखी, संधीवात, चक्कर येणे, गुडघेदुखी , फॅक्चरवरील शस्त्रक्रिया या आजारांवर योग्य उपचार व मार्गदर्शन व शस्त्रक्रिया करणार असल्याचे सांगितले. हॉस्पिटलमध्ये आय.सी.यु बेड,डीलक्स रूम बेड, सुसज्य अंतरुग्ण विभाग, सुसज्ज बाह्य रुग्ण विभाग, २४ तास तज्ञ डॉक्टरची उपलब्धता, अत्याधुनिक उपचार पद्धती प्रत्येक आजारावर सखोल निदान आणि योग्य उपचार छाती-पपूस हृदय मधुमेह आणि इतर आजारासाठी विश्वासार्ह सेवा देण्यात येतील असेही सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गवते यांनी केले. सुरेश बोऱ्हुडे व रावसाहेब रोहकले यांनी आभार व्यक्त केले.

# सध्याच्या पिढीमध्ये संस्कार मुल्ये रूजविणे गरजेचे- वर्षा पित्ती

## संजीवनी अकॅडमीमध्ये माध्यमिक विभागाचे वार्षिक स्नेहसंम्मेलन संपन्न

**कोपरगाव । किसन पवार**

भविष्यातील आदर्श नागरीक घडविण्याकरीता पालक, समाज, शाळा, अशा अनेक घटकांचा समावेश असतो. शालेय जीवनात मुलं मुली वयाच्या संक्रमण अवस्थेमधुन जात असतात, म्हणुन पालकांनी आपल्या पाल्यांचे मित्र बनून त्यांना समज द्यावी, तसेच त्यांच्यावर योग्य संस्कार मुल्ये रूजवावे, यामुळे ते भविष्यातील आदर्श नागरीक बनतील, असे प्रतिपादन जालना येथिल निसर्गोपचार व आयुर्वेदातील तज्ञ वर्षा पित्ती यांनी केले. संजीवनी अकॅडमीच्या माध्यमिक विभागाच्या वार्षिक स्नेहसंम्मेलनाच्या समारंभात पालकांसमोर वर्षा पित्ती प्रमुख पाहुण्या म्हणुन बोलत होत्या. यावेळी संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे, स्कूलच्या संचालिका डॉ. मनाली कोल्हे, हेड ऑफ अकॅडमिक गव्हर्नन्स डॉ. आर. एस. शेंडगे , हेड ऑफ



इन्स्टिटयूट सर्विस प्रकाश जाधव, एक्झिक्युटिव्ह प्रिन्सिपाल रेखा पाटील, प्राचार्या शैला झुंजारराव, आदी उपस्थित होते.

पालकांची उपस्थिती उल्लेखनिय होती. सांस्कृतिक कार्यक्रमात ‘गीता अमृतमः जीवन की संजीवनी’ या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारीत भगवतगीतेच्या विविध श्लोकांवर गीते, नाटीका, नृत्य सादर केले. यावर भाष्य करताना पित्ती म्हणाल्या की यातुन स्कूलने विद्यार्थ्यांमध्ये सात्विक, राजस उत्साह,क्रियाशिलता, प्रेरणा यांसारखे गुण जे व्यक्तीला गतिशिल आणि प्रभावी बनवतात अशा गुणांची पेरणी करून भक्तीयोग, ध्यानयोग व निष्काम कर्म रूजविले आहे. विद्यार्थ्यांच्या मनात अध्यात्माचे बी पेरले आहे, आता पालकांनी पाल्यांना श्लोकांचा अर्थ समजावुन अध्यात्माच्या बीयांना पाणी देण्याचे काम करावे. मुलांमध्ये जोश असतो तेव्हा पालकांमध्ये होश असणे गरजेचे आहे. मुलं ही भारताचे भविष्य असतात, पालकांनी हे भविष्य संजीवनी अकॅडमीच्या माध्यमातुन योग्य हातात दिले आहे, असे श्रीमती पित्ती शेवटी म्हणाल्या. प्रारंभी स्कूलच्या एक्झिक्युटिव्ह प्रिन्सिपाल रेखा पाटील यांनी सर्व मान्यवरांचे व पालकांचे स्वागत केले. प्राचार्या झुंजारराव यांनी वार्षिक अहवाल सादर केला.

यावेळी अमित कोल्हे म्हणाले की संस्थेचे संस्थापक स्व. शंकरराव कोल्हे यांनी ज्या हेतुने हे स्कूल स्थापन केले, तो हेतु संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष नितिन कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली सफल होत आहे.

येथील शिक्षक प्रत्येक विद्यार्थ्यावर वैयक्तिक लक्ष देत असुन संजीवनी विद्यापीठाचा स्टाफ येथे येत असुन त्या स्टाफकडे असलेले ज्ञान व कौशल्ये येथिल मुलांना मिळत आहे. यावेळी विध्यार्थ्यांनी धार्मिक संकल्पनेवर सादरीकरण केले. तसेच गीतांसाठी लागणारी सर्व संगीताची वाद्ये चिमुरडयांनीच वाजुवन उपस्थितांची मने जिंकली. व्यावसायिक रंगभूमीला साजेसा रंगमच, उत्कृष्ट ध्वनी व्यवस्था व लाईट इफेक्टस्, भव्य आसन व्यवस्था, विध्यार्थ्यांनीच सादर केलेल्या संगीतमय रचना, नृत्य, इत्यादींना रसिक प्रेक्षकांकडून प्रत्येक सादरीकरणानंतरची दाद, मराठी, हिंदी आणि अस्खलित इंग्रजी मधुन विध्यार्थ्यांनीच केलेले सुत्रसंचालन, या सर्व बाबींमुळे सांस्कृतिक कार्यक्रम संस्मरणीय ठरला, असे मत उपस्थित पालकांनी व्यक्त केले.

